

पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

सप्टेंबर २०२६

www.palakneeti.in

संपादक :

संजीवनी कुलकर्णी

कार्यकारी संपादक :

अनघा जलतारे

संपादक मंडळ :

प्रीती पुष्पा-प्रकाश, रुबी रमा प्रवीण,
प्रणाली सिसोदिया, कृणाल देसाई,
प्रीतम मनवे, ज्योती दळवी, अमृता ढगे,
विक्रांत पाटील, अमोघ चौगुले,
ऋषिकेश भरड, शिवांगी नाईक

विश्वस्त :

संजीवनी कुलकर्णी, नीलिमा सहस्रबुद्धे, शुभदा जोशी,
वंदना कुलकर्णी, प्रियंवदा बारभाई,
डॉ. विनय कुलकर्णी, रमाकांत धनोकर

अंक सजावट आणि मांडणी :

अमृता ढगे

आतील चित्रे :

इंटरनेटवरून साभार



पालकनीती परिवार

www.palakneeti.in

या अंकात...

१	**आनंदाचं सरप्राईज पॅकेज** ऋजुता भागवत खरे	४
२	**गॉन केस** स्वप्नील देशपांडे	७
३	**असं काय आक्षेपार्ह आहे?** ज्योती दळवी	९
४	**मुलांसाठी पुस्तकं घेताना आपण काय शोधत असतो?** बसवंत विठाबाई बाबाराव	११

जुने लेख / अंक वाचण्यासाठी पालकनीतीच्या वेबसाईटला अवश्य भेट द्या

www.palakneeti.in

आनंदाचं सरप्राईज पॅकेज

ऋजुता भागवत खरे

"**आ**ई, शाळेत बाईंनी 'माझी आई' या विषयावर लिहायला सांगितलेलं, मी लिहिलंय, तुला देऊ वाचायला?"

त्या दिवशी शाळेतून आल्यावर लेक माझ्यासमोर वही नाचवत म्हणाली. आपलं मूल स्वतःच्या भाषेत काही लिहितंय आणि ते आपल्याला वाचायला देतंय हा अनुभव मला फार मोलाचा वाटला. उत्सुकतेनं मी ते वाचू लागले. माझे डोळे शेवटच्या ओळीवर थबकले. 'माझी आई लहान मुलांसाठी सृजन उपक्रम केंद्र घेते, तिथे खूप मुलं येतात'. मी करत असलेल्या कामाची 'जगात भारी' पोचपावती मला त्या दिवशी मिळाली. 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' या माझ्या आवडत्या सिनेमातल्या माझ्या लाडक्या व्यक्तिरेखेचं, लैलाचं, वाक्य मला त्या क्षणी आठवलं – 'मै चाहती हूं की जिंदगी मुझे यूंही सरप्राईज करती रहे'. आईबाबा होणं हे असंच एक आनंदाचं सरप्राईज पॅकेज आहे असं मला नेहमी वाटतं. पालक असण्याचा हा प्रवास आपल्या कल्पनांच्या पुष्कळ पुढे जाणारा असतो; नव्या शक्यता, नव्या संधी देणारा असतो.

माझ्या जुळ्या मुली साधारण वर्ष-दीड वर्षाच्या झाल्या त्या टप्प्यावर त्यांना घराच्या पलीकडे जगाची ओळख कशी करून द्यायची इथपासून ते यथावकाश त्यांना कोणत्या शाळेत घालायचं इथपर्यंत अनेक विचार माझ्या मनात डोकावू लागले होते. त्यांच्या आजूबाजूला भरपूर पुस्तकं ठेवायची, अक्षरं लिहिण्याची घाई करणाऱ्या शाळेत त्यांना घालायचं नाही, माती-पाण्यात बागडायला द्यायचं, खूप गोष्टी सांगायच्या, शक्यतो त्यांच्यावर रागवायचं नाही, त्यांना शिक्षा करायच्या नाहीत, स्क्रीनपासून शक्य तेवढं लांब ठेवायचं... एक ना अनेक! वाचलेली पुस्तकं, ऐकलेले पॉडकास्ट, अनुभवी पालक मित्र-मैत्रिणी, आईबाबा आणि काही समविचारी व्यक्तींशी होणाऱ्या चर्चा ह्या सगळ्यातून आपण योग्य वाटेवर आहोत की नाही याची चाचपणी करणंही सुरू होतं. अशातच माझी ओळख स्नेहाशी झाली. ती पेशानं सायकॉलॉजिस्ट आणि समवयस्क-समविचारी आई असल्यानं आमच्या तारा जुळल्या. आमच्या पोरींचीही गट्टी जमली. त्या खेळत असताना आमच्या गप्पा चालत. त्यातून एक कल्पना पुढे आली. आपल्या मुलींसोबत आणखी काही चिल्ल्यापिल्ल्यांना एकत्र करून खेळ, चित्रं काढणं, गोष्टी ऐकणं, नाच करणं अशा काही गमतीजमती केल्या तर? मुलांना यावंसं वाटेल, कोणतेही जाचक नियम-अटी नसतील, मोकळेपणानं खेळायला-बोलायला-नाचायला मिळेल अशी एखादी जागा आपण मुलांसाठी तयार केली तर?

रूढ अर्थानं अशा प्रकारच्या कामाचा अनुभव किंवा शिक्षण आमच्याकडे, म्हणजे निदान माझ्याकडे तरी नव्हतं. पण नवे प्रयोग करण्याचा आणि चुकत-शिकत पुढे जात राहायचा किडा मात्र नक्कीच होता. टेनिसपटू आर्थर ॲश ह्याचे 'स्टार्ट व्हेअर यू आर. यूज व्हॉट यू हॅव. डू व्हॉट यू कॅन' हे सूत्र मनात धरून आम्ही कामाला लागलो. गुढीपाडव्याला एका छोटेखानी कार्यक्रमाद्वारे 'सृजन उपक्रम केंद्राचा' शुभारंभ करायचं ठरलं. नव्या कल्पना आणि उत्साहाला तोटा नव्हता. म्हटलं तर सगळंच अमूर्त होतं. आमच्या मनात मात्र स्वच्छंद बागडणाऱ्या छोट्या छोट्या पोरांच्या आनंदी जगाचं चित्र तयार झालेलं होतं. असं सगळं मस्त सुरू असतानाच मार्च २०२० मध्ये करोनानं सगळं जग आपल्या ताब्यात घेतलं...

दोन वर्षांच्या लॉकडाऊननंतर पुन्हा जगरहाटी सुरू झाली तोवर आमच्या लेकींच्या आयुष्यात शाळा नावाची गोष्ट आलेली होती. करोनाच्या संकटानं लहान मुलांचं जग कसं आणि किती बदलून टाकलंय याबद्दलच्या चर्चा, अभ्यास कानावर पडत होते. अनेक गोष्टी प्रत्यक्ष दिसत होत्या. अनेक प्रश्न, चिंता सतावत असल्या, तरी आपल्या मुलींसोबत भोवतालच्या इतर मुलांचं बालपण आनंदमय असावं म्हणून दोन वर्षांनी पुन्हा एकदा पूर्वीच्याच उत्साहानं आम्ही तयारीला लागलो. चार ते सहा वयोगटातली मुलं, आठवड्यातले दोन दिवस, प्रत्येक दिवशी दोन तास असा प्राथमिक आराखडा आम्ही ठरवला. हा उपक्रम शाळेला पूरक असल्यानं मुलांच्या शाळेचं वेळापत्रक लक्षात घेऊन संध्याकाळी साडेपाच ते साडेसात अशी वेळ निश्चित केली. आणि आमच्या मुली आणि त्यांची मित्रमंडळी अशा आठ मुलांसोबत आमच्या 'सृजन उपक्रम केंद्रा'चा ओनामा झाला.



मुलांसोबत आपण काय काय करू शकतो याचा विचार करत असताना हॉवर्ड गार्डनर या सायकॉलॉजिस्टचा 'बहुविध बुद्धिमत्ता सिद्धांत' (Multiple Intelligence Theory) आणि डॉ. श्रुती पानसे यांचं ह्याच विषयावरचं 'बहुरंगी बुद्धिमत्ता' हे पुस्तक आम्ही संदर्भासाठी वापरलं. साधारणपणे आकडेमोड, स्मरणशक्ति, पाठांतर या क्षमतांना आपल्याकडे 'बुद्धिमत्ता' मानलं जातं. परंतु शरीराच्या प्रमाणबद्ध, वेगवान हालचाली, संगीताचं आकलन, दृश्यकला, इतरांच्या आणि स्वतःच्या भावना ओळखून त्यानुसार वागणं, निसर्गातल्या गोष्टींकडे सजगपणे पाहणं हे सगळे बुद्धिमत्तेचेच आविष्कार आहेत. प्रत्येक मूल यापैकी कोणत्या ना कोणत्या गोष्टीत रस घेतं. आणि प्रोत्साहन मिळालं तर त्यात पारंगतही होऊ शकतं. सृजन उपक्रम केंद्राचं वेळापत्रक ठरवताना शारीरिक हालचाली, चित्रकला, हस्तकला, गाणी, गोष्टी, चित्रवाचन, मनमोकळ्या गप्पा, प्रार्थना, एकत्र मिळून खाऊ तयार करणं, आपल्या भोवतालाचं निरीक्षण करणं, दगड-पानं-फुलं-पिसं गोळा करणं अशा विविध गोष्टींचा त्यात अंतर्भाव असावा याची आम्ही काळजी घेत होतो.

एका शुक्रवारी आम्ही आमच्या संग्रहात असणारी लहान मुलांची सगळी पुस्तकं मांडून ठेवली. मुलांना सांगितलं की तुम्हाला हवं ते पुस्तक घ्या, त्यातली चित्रं पाहा, एकमेकांना दाखवा, आपल्याला पुस्तकातलं काय आवडलं हे इतरांना सांगा. त्यांना पुस्तकं पाहायला आवडेल की कंटाळा येईल याबद्दल आम्ही जरा साशंक होतो; परंतु मुलांनी शंकेला जागाच ठेवली नाही. मुलांना पुस्तकं हाताळायला, त्यातली चित्रं पाहायला मजा येत होती. काहीतरी आठवून मधूनच ती खुदकन् हसत होती, आपल्याला पुस्तकात काय सापडलं हे इतरांना सांगत होती. म्हणजे एक गोष्ट नक्की – मुलांची पुस्तकांशी दोस्ती होऊ शकते. मग पुस्तकातलं आवडलेलं चित्र आपण काढून बघणं, एखादं गाणं म्हणणं, त्यावर नाचणं, चित्रं पाहत पाहत गोष्ट ऐकणं असे अनेक उपक्रम पुस्तकांभोवती गुंफता आले.

सृजन वर्ग सुरू झाला जुलैमध्ये, म्हणजे पावसाळ्यात. मग त्याला अनुसरून होड्या तयार करून पाण्यात सोडणं, बेडूक-उड्या मारणं, बेडकांचं गाणं म्हणणं, बी ते रोप हा प्रवास बघण्यासाठी कडधान्यं पेरून त्यांची रोपं तयार करणं ह्या गोष्टीही आम्ही केल्या. मुलांना मातीत हात घालायला, चिखलात खेळायला खूप आवडत असणार अशी आमची धारणा होती. मात्र दोन मुली 'शी माती घाण असते, आमचे हात खराब होतील' म्हणाल्या. माती घाण नसते, मातीत काम करून झाल्यानंतर आपण आपले हात साबणानं स्वच्छ धुवायचे अशी समजूत घातल्यानंतरही काहीशा अनिच्छेनंच त्यांनी मातीत बिया पेरल्या. 'मुलांशी बोलता-वागताना कोणतीही गृहीतकं मनात ठेवायची नाहीत' हा ह्यातून आम्हाला मिळालेला पहिला धडा.

मुलांना गप्पा मारायला खूप आवडतात हे लक्षात आल्यानं वर्गाची पहिली किंवा शेवटची पंधरा मिनिटं आम्ही गप्पांसाठी राखून ठेवू लागलो. गोल करून बसायचं आणि प्रत्येकानं कोणतीही एक गंमत सांगायची असं याचं स्वरूप असतं. इतर मुलं बोलत असताना ऐकायची सवय मुलांना आपोआपच लागली. सुरुवातीला बोलायला बिचकणारी मुलं हळूहळू मोकळी होत गेली. मुलांच्या गप्पांना विषयांचं बंधन नसतं. त्यांना कशाचा आनंद होतो, कशाची भीती वाटू शकते, आई/बाबा/शिक्षक यांचं वागणं ती कशी टिपून घेतात अशा अनेक गमती या गप्पांतून आम्हाला उलगडल्या.

सृजनमधे येणाऱ्या सगळ्या मुलांची ओळख ठरेल अशी काहीतरी कलाकृती आम्हा सर्वांना मिळून तयार करायची होती. आम्ही एका मोठ्या कार्डशीटवर झाडाचं खोड काढून ते रंगवलं. मग प्रत्येकानं कागदाचं एकेक पांढरं पान आपल्या आवडीच्या रंगानं रंगवलं. पिवळी, गुलाबी, निळी, हिरवी, चॉकलेटी अशी रंगीबेरंगी पानं खोडावर मिरवणारं झाड आम्हाला सांगत होतं, की प्रत्येकाचा रंग वेगळा आहे, सुंदर आहे, आणि आपण सगळे एकाच मातीत रुजणार आहोत, बहरणार आहोत.



सृजनचं हे रोपटं यंदा पाच वर्षांचं होऊ घातलं आहे. स्नेहा, मी आणि आठ मुलांपासून सुरू झालेल्या ह्या कुटुंबाचा आज चांगलाच विस्तार झाला आहे. या पाच वर्षांत आम्ही सर्वांनी आनंदाचे अनेक क्षण अनुभवले. व्यक्तिशः मला हा आनंद थक्क करून टाकतो. लहान मुलांच्या सहवासात आपण इतके खूश राहू शकतो याची मला खरोखरच कल्पना नव्हती. आई म्हणून आपल्या मुलांसोबत रमणं आणि पूर्णपणे अनोळखी मुलांच्या भावविश्वाचा भाग होणं या दोन्ही गोष्टींत खूप अंतर आहे. अर्थात याचं सगळं श्रेय मुलांचंच. त्यांच्याकडे असणारा प्रेमाचा निर्व्याज झरा त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला वाहतं करतो. त्यांच्या निष्पाप सहवासात आपले स्वतःबद्दलचे, जगाबद्दलचे अनेक समज ढासळतात.

***

'ताई सृजन वर्ग रोज का नसतो?', 'ताई मला शाळापण सृजनसारखीच पाहिजे!' असं म्हणत इथे येणारी मुलं एक जादुई आनंद घेऊन येतात. हा आनंद संसर्गजन्य असतो. त्यांच्या सहवासातल्या सर्वांना त्याची लागण होते आणि हळूहळू आपल्या जगण्याला एक कोवळी, पोपटी किनार चढू लागते. या पोरांचं उद्याचं जग अधिक सुंदर होण्यासाठी आपण निमित्तमात्र ठरू शकलो ही जाणीव मोठंच समाधान देऊन जाते.

पालक होण्याच्या खूप आधीपासून मी पालकनीतीची वाचक होते. पालकनीतीमध्ये वाचलेल्या लेख-कविता-चित्रांचा, इथे भेटलेल्या माणसांचा माझ्या आईपणावर कळत नकळत पुष्कळ प्रभाव पडत गेला. त्यामुळे पालकनीतीच्या माध्यमातून सृजन उपक्रम केंद्राच्या अनुभवांबद्दल लिहिण्याचा मनस्वी आनंद होतो आहे. आपण करत असलेल्या कामाकडे तटस्थ होऊन पाहिलं तरच आपण नेमकं, मार्मिक लिहू शकतो. मात्र आठवणीत रमणं हा माझा स्थायिभाव असल्यानं तटस्थ होऊन लिहिणं जमेल का अशी शंका माझ्या मनात डोकावते. अर्थात, केवळ आठवणींची मालिका लिहिणं हा या लेखनाचा उद्देश नाहीये. गेल्या पाच वर्षांत सृजन उपक्रम केंद्रामध्ये पन्नासेक मुलांना आणि त्यांच्या पालकांना जवळून पाहता आलं. त्याचबरोबर शिक्षण, पालकत्व याबद्दल थोडंफार, खरं तर फार थोडं, वाचन झालं. या सगळ्यामुळे मुलं, पालक, शिक्षण यांकडे पाहण्याची एक सजग आणि सावध नजर हळूहळू तयार होऊ लागली आहे. मूलकेंद्री काम करणाऱ्या अनेक व्यक्ती, संस्थांशी परिचय झाला आहे. झपाट्यानं बदलणाऱ्या भोवतालानं माझ्या मनात अनेकदा चिंतेचं, काळजीचं मोहोळ उठवलं आहे. हे सगळं संचित सोबत घेऊन पुढे जात असताना मला जाणवणाऱ्या गोष्टी, येणारे अनुभव नोंदवणं हा धागा मनात ठेवून दर महिन्याच्या अंकातून एक विषय – अनुभव मांडायचा माझा प्रयत्न असेल.

लहान मुलांना केंद्रस्थानी ठेवून विचार करणाऱ्या, काम करणाऱ्या एका मोठ्या साखळीशी जोडलं जाण्याच्या या प्रवासात आनंदाचं एखादं सरप्राईज पॅकेज माझी वाट पाहत असणार याची मला खात्री आहे.



ऋजुता भागवत खरे
kharerujuta@gmail.com
लिहायला, वाचायला, गोष्टी सांगायला आणि निसर्गात भटकायला आवडणारी जुळ्या मुलींची आई.

गॉन केस

स्वप्नील देशपांडे

कुठल्या कारणांमुळे ते माहीत नाही, पण शाळेत असताना मला केस वाढवण्याची खूप इछा होती. पण इतर शाळांप्रमाणेच माझ्याही शाळेत मुलग्यांना केस वाढवण्याची परवानगी नव्हती. नखं वाढवायची नाहीत हे समजत होतं, कारण त्यामागे स्वच्छता हे कारण होतं, पण केस वाढवण्याबद्दल नेमका काय आक्षेप आहे, हे मला समजत नव्हतं. बरं शाळेतल्या अनेक मुलींचे केस तर लांब होते, मग मी का ठेवू शकत नाही, हा प्रश्न काही माझ्या मनातून जात नव्हता. घरूनही कुणाचा काही विरोध होता असं नाही, माझ्या मोठ्या भावाचेही केस चांगले लांब होते.

शाळाही खूप पारंपरिक विचारांची नव्हती. संवाद, प्रश्न विचारणं, शिक्षकांच्या मतांशी सहमत नसणं, या सगळ्याला प्रोत्साहनच दिलं जायचं. स्वातंत्र्य, समता या तत्त्वांवरही शाळेचा विश्वास होता. म्हणून मी नियमांना न जुमानता केस वाढवायचं ठरवलं.

केस आणखी वाढल्यावर खेळाच्या ताईंनी मला ते कापायला सांगितले, आणि मी अर्थातच त्याला विरोध केला. थोडीफार भीती वाटत होती, पण माझा माझ्या मतांवर विश्वास होता. एक-दोन आठवड्यांनी ताईंनी पुन्हा केस कापण्याची आठवण केली, पण मी तरीही कापले नाहीत. 'तू अजूनही केस कापले नाहीस, तर मी शाळेतच तुझे केस कापेन' असं त्यांनी मला सांगितलं; शिवाय, तोपर्यंत मला खेळाच्या तासाला, कुठल्याही खेळात सहभागी व्हायला मनाई केली. माझे मित्र-मैत्रिणी खेळत असायचे, आणि मी आपला माझ्या केसांसोबत बाजूला बसून फक्त त्यांना बघायचो.

एव्हाना या सगळ्याबद्दल मी इतर ताईंशी चर्चा करायला सुरुवात केली होती.

"मला केस वाढवण्याचं स्वातंत्र्य किंवा अधिकार का नाही? त्यातही, मुली केस वाढवत असतील, ताईंचे केसही लांब असतील, तर माझे का असू शकत नाहीत?"

वेगेवगेळ्या ताईंनी मला वेगवेगळे प्रतिसाद दिले. एक-दोन ताईंना माझं म्हणणं तत्त्वतः पटत होतं; पण या कारणावरून मी ताईंशी वाद घालू नये असं त्यांना वाटत होतं. कुणाला हा मुद्दा खूपच निरर्थक वाटत होता. ह्यावर विनाकारण माझा वेळ आणि ऊर्जा खर्च होते आहे, असं त्यांना वाटत होतं, तर कुणी 'बरोबर आहे तुझं, पण जाऊ दे रे' असंही म्हणत होतं. कुणी मला ठामपणे चुकीचं ठरवत नव्हतं, पण मी केस का वाढवू नयेत ह्याचं एकही ठोस कारण देत नव्हतं. कदाचित कुणी यावर फारसा विचार केलेला नव्हता, आणि आजवर कधी कुणी हा प्रश्नही विचारला नव्हता.

या सगळ्यात वर्गातल्या किंवा शाळेतल्या इतर मुलांचं फार काही परखड असं मत नव्हतं. अराजकीय किंवा कुंपणावर म्हणतो, तसे बहुतेक सर्व याबद्दल उदासीन होते. माझ्याशिवाय इतर कुणाला बहुधा केस वाढवण्यात फारसा रस नव्हता, आणि असला, तरी त्यासाठी ताईंशी वाद घालण्याची कुणाची इच्छा नव्हती. माझ्यासाठी मात्र हा केस वाढवण्यापेक्षा जास्त लिंगभाव आणि तत्त्वाचा मुद्दा होता. त्यामुळे इतर मुलं उदासीन असली, तरी मी माझं मत मांडतच राहिलो.

या सगळ्या चर्चा, खेळाच्या तासाला बाहेर बसणं, कधी वेळ पडली तर इतर मुलींचा हेअर बॅन्ड लावून सहभाग घेण्याचा प्रयत्न करणं, हे काही दिवस चाललेलं होतं. ताईंनाही आता समजत होतं, की समता व स्वातंत्र्य या तत्त्वांवर आपली शाळा उभी आहे. त्यामुळे याला केस वाढवण्याची परवानगी नाकारताना आपण किमान एक तरी ठोस कारण द्यायला हवं, आणि तसं ते कुणाकडे नसलं, तर मग शाळेच्या नियमात आपल्याला बदल करायला हवेत.

मध्ये काही दिवस गेले. आणि एक दिवस सकाळची नियमित प्रार्थना झाल्यानंतर ताई म्हणाल्या, की त्यांना एक सूचना द्यायची आहे. त्यांनी सांगितलं, की आता मुलगा असो वा मुलगी, कुणीही हवे तितके लांब केस ठेवू शकणार होतं. त्याची नियमावलीही त्यांनी सांगितली. केस खांद्यापर्यंत लांब असतील तर ते कशा प्रकारे बांधावेत, त्याहून मोठे असतील तर कसे बांधावेत वगैरे; मात्र ते नियम मुलगे व मुली दोघांसाठीही सारखे होते. त्या क्षणी मी इतका आनंदलो होतो, की त्या नियमापेक्षा, मला केस वाढवायला मिळतील, त्याला कुणाचाही कसलाही

विरोध असणार नाही, आणि मुख्य म्हणजे खेळाच्या तासाला मला खेळता येईल, या कल्पनेतच मी रमलो होतो.

प्रार्थना झाल्यावर सगळे वर्ग रांगेनं आपापल्या वर्गात जायचे. आणि तेव्हा, जाताना मी काही ताईंकडे पाहिलं. त्यांच्या चेहऱ्यावर फक्त आनंद आणि काही प्रमाणात अभिमान दिसत होता. कुठेही राग किंवा असहमती दिसली नाही, कारण त्यांच्याच एका विद्यार्थ्यानं, शाळेच्या तत्त्वांच्या आधारानंच, शाळेत एक बदल घडवून आणला होता. हा बदल क्रांतिकारी नसेलही, पण माझ्यासाठी तो, तत्त्वांवर आधारित, एक मूलभूत बदल होता.

जसजसा मी मोठा होत गेलो आणि समाजशास्त्र व लिंगभावाचा अभ्यास करू लागलो, तसतसं मला हे अजूनच जाणवू लागलं. या सगळ्यात कुठेही मी विरुद्ध शाळा किंवा मी विरुद्ध ताई, असा वैयक्तिक संघर्ष नव्हता. प्रश्न विचारण्याच्या वृत्तीला गुन्हा मानलं जाईल अशा वातावरणात सध्या राहत असताना, व्यक्तिस्वातंत्र्य या तत्त्वावर आधारित, संवादाच्या माध्यमानं, लोकशाहीवर असलेल्या विश्वासामुळे, लिंगभावाधारित भूमिकांच्या चौकटी मोडणारा, असा हा अनुभव अजूनही मला उमेद देतो.

या सगळ्यानंतर जवळजवळ १२ वर्षांनी, म्हणजे आत्ता २०२६ मध्ये, शाळेत प्रयास आरोग्य गटाचा 'सहज' हा सर्वंकष लैंगिकता शिक्षणाचा कार्यक्रम सुरू होणार होता. त्यासाठी मी माझ्या सहकाऱ्यांसोबत प्रशिक्षक म्हणून जाणार होतो. कार्यक्रम सुरू होण्याआधी सगळ्या ताईंची 'लैंगिकता शिक्षण' या विषयावर एक कार्यशाळा घ्यायला म्हणून मी शाळेत गेलो होतो. यावेळी माझे केस मोठे नव्हते, पण मी स्कर्ट घालून गेलो होतो. उपस्थित असलेल्या एकाही ताईनं मला त्याबद्दल कुठलाही प्रश्न विचारला नाही, किंवा भुवया उंचावल्या नाहीत. तेव्हा मला जाणवलं, की बारा वर्षांपूर्वी मी जे काही मांडलं होतं त्याचा, काही प्रमाणात का होईना, परिणाम म्हणून मी स्कर्ट घातला असूनही कुणाला त्यात काही वावगं वाटलं नाही.

कार्यशाळा सुरू व्हायच्या आधी काही ताई आणि मी बोलत होतो. त्यावेळी मी प्रश्न विचारणं कसं योग्यच होतं, मुलांनी प्रश्न विचारायलाच हवेत, वेगवेगळ्या विचारांचं महत्त्व या अंगानं आमच्यात अनौपचारिक चर्चा सुरू होती. ताई म्हणाल्या, की आम्ही अजूनही मुलांना त्या प्रसंगाचं उदाहरण देतो. त्या प्रसंगाचा दाखला देत माझ्याकडे बघत एक ताई कौतुकानं म्हणाल्या, "आम्ही मुलांना सांगतो, 'गॉन केस' असावी तर तुझ्यासारखी!"




स्वप्नील देशपांडे

swapneel@prayaspune.org

स्त्रीवादी सामाजिक कार्यामध्ये पदव्युत्तर पदवी. सध्या प्रयास आरोग्य गट, पुणे येथे कार्यरत आहेत.

असं काय आक्षेपार्ह आहे?

ज्योती दळवी



असं काय आक्षेपार्ह आहे 'आय ॲम मलाला' या पुस्तकात, की एका शाळेच्या वाचन उपक्रमाच्या यादीत या पुस्तकाचं नाव असल्यानं धर्मरक्षकांनी इतका गदारोळ करावा? इतकचं नव्हे तर वाचनकट्टा चालवणाऱ्या काही हौशी पुस्तकप्रेमींना या पुस्तकाचं वाचन केल्याबद्दल मारहाण करावी? गुजरात राज्यातल्या अहमदाबादला घडलेल्या या दोन घटना. एक शाळेत घडली, तर दुसरी एका सार्वजनिक उद्यानात. या पुस्तकात इस्लामचा प्रचार केलेला आहे, की पाकिस्तानची गौरवगाथा गायलेली आहे, की इतर धर्मांविषयी अपप्रचार केलेला आहे? कुणाच्या भावना दुखावल्या जाव्यात असं काय असावं या पुस्तकात?

पहिल्यांदा जगाचा भौगोलिक नकाशा काढा. आपण इयत्ता सहावी-सातवीत शिकलेल्या हिंदुकुश पर्वतरांगा कुठे आहेत ते त्यात बघा. मग त्यात स्वात नावाच्या नदीचा प्रवाह शोधून काढा. या निळ्याशार नदीच्या खोऱ्यात आणि बर्फाच्छादित पर्वतरांगांच्या कुशीत वसलेली पश्तून जमातीची अनेक छोटी छोटी गावं इथे दिसतील. पश्तुनांबरोबरच इथे कोहिस्तानी, गुजर जमातीचे लोकही राहतात. सोळाव्या शतकात अफगाणिस्तानच्या काबुल प्रांतातून पळून आलेले पश्तून आता पाकिस्तानचाही भाग आहेत. पण त्यांचं वास्तव्य या खोऱ्यापुरतंच मर्यादित आहे. निसर्गानं मुक्त हस्तानं सौंदर्याची उधळण केलेला हा भाग सध्या खैबर पख्तूनख्वा नावानं ओळखला जातो.

आता इतिहासाचा विश्वकोश उघडा. फार खोलात जायचं नसेल, तर गूगलही करू शकता. तुलनेनं आदिवासी समजल्या जाणाऱ्या या भागात धर्म कुठून आला? त्याची कथा अशी, की पश्तुनांच्या आधी या भागात दुसऱ्या शतकात आलेल्या बौद्ध राजांची सत्ता होती. साधारण पाचशे वर्षं त्यांनी राज्यकारभार केला. या राजांनी उभारलेली अनेक मंदिरं, शिलालेख, स्तूपांचे अवशेष अजून इथे शिल्लक आहेत. (बौद्ध धर्माच्या अभ्यासकांसाठी ही माहिती उपयुक्त ठरू शकते.) अकराव्या शतकात महमूद गझनीच्या आक्रमणानंतर इथे इस्लाम आला, असं सांगितलं आहे.

आता संस्कृती-कोश उघडा. अतिशय दुर्गम पण निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या या लोकांची समाजव्यवस्था, त्यांच्या धारणा, त्यांची उपजीविकेची साधनं काय होती, ह्याबद्दल माहिती घेत असताना आपण नकळत त्यांची आणि आपल्याकडे अशा पद्धतीचं जीवन जगणाऱ्या लोकांची तुलना करत असतो आणि त्यातलं साधर्म्य टिपत असतो.

आता राजकीय इतिहासाचा विश्वकोश उघडा. अतिशय दुर्गम आणि सर्वार्थानं मागास समजला जाणारा हा भाग जगाच्या राजकीय पटलावर कसा आला, हे समजलं तर सध्याचे देशादेशांमध्ये असलेले राजकीय हितसंबंध समजायलाही मदत होईल. त्यासाठी इतिहासाची पानं उलटावी लागतील. अमेरिकेतल्या 'वर्ल्ड ट्रेड सेंटर'वर सप्टेंबर २००१ मध्ये झालेल्या हल्ल्यानंतर जगभरात मुस्लिमविरोधी वारं वाहू लागलं आणि देशादेशांतील राजकारणात धर्माचा मुद्दा केंद्रस्थानी आला. या हल्ल्याचा सूत्रधार आणि 'अल कायदा' या दहशतवादी संघटनेचा संस्थापक ओसामा बिन लादेन त्याच्या शेवटच्या दिवसांत या स्वात खोऱ्यातच आश्रयाला होता! तसेच तालिबान या अतिरेकी संघटनेचा संस्थापक मुल्ला ओमर हादेखील बराच काळ या भागात कार्यरत होता. खनिज तेलानं समृद्ध असलेल्या मध्यपूर्वेकडच्या देशांमध्ये तालिबानचा चांगलाच दबदबा आहे. तेलाच्या अवतीभोवती फिरणाऱ्या जागतिक राजकारणात तालिबानचं महत्त्व नाकारता येणार नाही. या संघटनेची सुरुवात कशी, कुठे, का आणि कुणी केली, अमेरिका, रशिया या प्रगत समजल्या जाणाऱ्या देशांची तालिबानच्या निर्मितीत काय भूमिका होती, अशा सर्व प्रश्नांची उत्तरं मिळाली तर राजकारणाचा खेळ समजायला मदत होते.

याच विश्वकोशातून आपण पाकिस्तानबद्दलही जरा माहिती घेऊया. शेवटी आपला सख्खा शेजारी तो! पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांची हत्या करून सत्तेत आलेल्या जनरल झिया

यांच्या कारकिर्दीत पाकिस्तानात धार्मिक वारं कसं जोरात वाहू लागलं, या देशाच्या आर्थिक परिस्थितीचा आणि आपापसात लढणाऱ्या तिथल्या छोट्या छोट्या जमातींचा उपयोग बलाढ्य राष्ट्रांनी आपली पोळी भाजण्यासाठी कसा करून घेतला, त्यामुळे आधीच होरपळत असलेल्या या देशाची कशी वाताहत झाली, अशी सर्व माहिती आपल्याकडे असली म्हणजे 'अपना मुकाबला किसके साथ है' याचं भान राहतं.

आता विश्वकोशांची मदत घ्यायची ठरवली तर बरंच वाचावं लागणार आणि इंटरनेटच्या महाजालातून गाळून माहिती घेणंही फारसं सोपं काम नाही. त्यापेक्षा 'आय ॲम मलाला' पुस्तक वाचलं, तर सगळंच साध्य होईल. पाकिस्तानमधील स्वात खोऱ्यात राहणाऱ्या आणि शांततेसाठी कार्य करणाऱ्या मलाला युसूफ़झाई हिचं हे आत्मचरित्र आहे. ब्रिटिश पत्रकार क्रिस्टियाना लॅम्ब यांच्या मदतीनं तिनं हे पुस्तक लिहिलं आहे. पुस्तक वाचताना कधी हरवायला होतं तर कधी आश्चर्यानं बोटं तोंडात जातात. कधी हळहळ वाटते, तर कधी संताप येतो. कधी काळजीनं डोळे पाणावतात. आणि गंमत म्हणजे असा वेगवेगळ्या भावनांचा प्रवास सुरू असताना नकळतच आपला जागतिक घडामोडींकडे पाहण्याचा दृष्टिकोनही विकसित होत असतो.

अशा सामाजिक राजकीय पार्श्वभूमीवर युसूफ़झाई या पश्तुनांच्या एका उपजमातीत एका गरीब शिक्षकाच्या घरात मलालाचा जन्म झाला. हिंदुस्तानात मुलीच्या जन्माची जी कहाणी आहे, थोड्याफार फरकानं तीच कहाणी पाकिस्तानात. आणि तीच अवस्था तिथल्या नोकरशाहीचीही.(त्यांची अवस्था आपल्यापेक्षा अधिक बिकट.) आपले लोक अशा अवस्थेत का आहेत आणि ही परिस्थिती बदलायची असेल, तर बंदूक नव्हे, शिक्षणाचं शस्त्र उचलावं लागेल असा मलालाच्या वडिलांचा आग्रह असतो. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून मलाला त्यांनी हाती घेतलेलं शिक्षणाचं व्रत दारोदारी पोचवण्याचं काम हाती घेते. हे काम करत असताना तालिबान तिच्या हत्येचा कट रचते. त्याप्रमाणे कृतीही केली जाते; मात्र नियतीच्या मनात काही वेगळंच असतं. एखाद्या चित्रपटाचा क्लायमॅक्स बघताना जसे अंगावर काटे उभे रहातात तसं तिच्या जीवन-मृत्यूचा चित्तथरारक प्रवास वाचताना होत राहतं.

आपल्या वडिलांच्या सारासार विचारबुद्धीचं उदाहरण देताना मलालानं सलमान रश्दी यांच्या 'द सॅटॅनिक व्हर्सेस' या वादग्रस्त पुस्तकाबद्दलचा किस्सा सांगितला आहे. मोहम्मद पैगंबर यांच्यावरील हे पुस्तक १९८८ मध्ये प्रकाशित झालं. पैगंबरांचा अनादर केल्याच्या आरोपावरून संपूर्ण मुस्लिम-जगतात या पुस्तकावर तत्काळ बंदी घालण्यात आली. त्यावेळी मलालाचे वडील कॉलेजमध्ये शिकत होते. या विषयावर आयोजित एका वादविवाद स्पर्धेत बोलताना त्यांनी 'पुस्तकावर बंदी घालण्याऐवजी आपण उत्तरादाखल म्हणून दुसरं पुस्तक छापायला हवं' असं सभ्य मत मांडलं होतं.

आपणही या लेखात पुस्तकांवरच्या बंदीविषयीच बोलतो आहोत, म्हणून हा उल्लेख प्रस्तुत ठरतो.

मलालाबरोबरच ॲन फ्रँक ह्या ज्यू मुलीचं पुस्तकही अहमदाबादमधल्या शाळेच्या वाचन-यादीत होतं. इतर धर्माचं पुस्तक म्हणून विरोधकर्त्यांनी याही पुस्तकाच्या वाचनाला विरोध केला. नाझी जर्मनीच्या काळात हिटलरच्या अत्याचारांपासून बचाव व्हावा म्हणून एका गुप्त ठिकाणी लपून बसलेल्या ज्यू कुटुंबातील १४-१५ वर्षांची ही ॲन फ्रँक. त्या काळात या किशोरवयीन मुलीनं केलेलं हे लिखाण, 'द डायरी ऑफ ॲन फ्रँक', वाचण्याचा आग्रह जवळपास सगळ्यांनाच त्यांच्या लहानपणी झालेला आहे.

प्रत्येकानं आपापल्या धर्माचीच पुस्तकं वाचावीत असा नियम करायचा म्हटलं, तर मग तो नियम इतरही ठिकाणी लागू होईल. आपापल्या जाती-जमाती, गट, समाज, विचारप्रणाली आणि तत्सम इतर गोष्टी.

मग साहित्य म्हणजे आरसा आणि खिडकी अशा गोष्टींना काहीच अर्थ उरत नाही.

मी आणि माझे पोट! खा, प्या, निजा!

तळटीप : *समाधानाची बाब म्हणजे अजून तरी ह्या दोन्ही पुस्तकांवर आपल्याकडे बंदी आलेली नाही. तेव्हा आपल्या मुलाबाळांसकट ही पुस्तकं आपण जरूर वाचूयात.*



ज्योती दळवी
bhadwal.jyoti@gmail.com
पुस्तकप्रेमी.

मुलांसाठी पुस्तकं घेताना आपण काय शोधत असतो?

बसवंत विठाबाई बाबाराव



गेली काही वर्षं आम्ही 'सृजन बुक्स' ह्या नावानं पुस्तक-वितरणाचं काम करतो. त्याचाच एक भाग म्हणून निरनिराळ्या कार्यक्रमांमध्ये आम्ही पुस्तकांचं छोटंसं दुकानही लावतो. ह्या उपक्रमांतून मला पुस्तकांपेक्षा माणसंच अधिक भेटली. लेखक, संपादक, प्रकाशक, पुस्तक विक्रेते, शिक्षक, पालक, वाचकांशी ओळखी झाल्या. काही ओळखी मैत्रीत बदलल्या. वाचन, लेखन, पुस्तकं आणि मुलांचं शिक्षण याभोवती समविचारी माणसांचा एक छोटासा समुदाय तयार झाला. हा समुदाय व्हॉट्सॲप ग्रुपसारखा केवळ संदेशांची देवाणघेवाण करणारा नाही. पुस्तक वाचून त्यावर बोलणं, एखाद्या पुस्तकाची इतरांना शिफारस करणं, मुलांसाठी म्हणून पालकांनी काय वाचावं यावर चर्चा करणं, एखाद्या अनुभवातून आपलं मत बदलणं, असे अनेक संवाद त्यात घडत असतात.

पुस्तकांच्या वितरणातून मला आर्थिक मदत होते हे खरं असलं तरी, हा माझ्यासाठी निव्वळ व्यवसाय कधीच नव्हता. केवळ आर्थिक फायदा हेच त्यामागचं कारण असतं, तर हे काम कदाचित कधीच थांबलं असतं. कारण अनेकदा दूरच्या कार्यक्रमाला पुस्तकांचं प्रदर्शन घेऊन जाणं, येण्या-जाण्याचा, पुस्तकांच्या वाहतुकीचा खर्च करणं, दिवसभर तिथे बसणं आणि शेवटी एखादंही पुस्तक विकलं न जाणं, असे अनुभवही आले आहेत. त्या वेळी थोडी निराशा होते खरी; पण अशा वेळीही पुस्तकांपेक्षा लोकच जास्त काही शिकवून जातात.

हे पुस्तक उपयोगाचं आहे ना?

एका पुस्तक प्रदर्शनात एक लहान मुलगा पुस्तकांकडे उत्सुकतेनं पाहत होता. एक पुस्तक हातात घेऊन तो पानं उलटू लागला. तेवढ्यात त्याच्या पालकांनी त्याच्या हातातलं पुस्तक काढून घेतलं. 'आधी शाळेची पुस्तकं वाच. अभ्यास पूर्ण कर.'

मुलगा बिचारा पुस्तकाकडे वळून वळून पाहत असताना पालक त्याला हाताला धरून पुढे निघून गेले. असा प्रसंग एखाद्याच प्रदर्शनात एखादाच घडतो असं नाही; तो वारंवार घडतो.

मुलानं पुस्तक हातात घेतलं, की त्यानं त्यातून काहीतरी शिकायलाच हवं, अशी पालकांची अपेक्षा असते. फक्त चित्रांचं पुस्तक घेतलं तर त्यातून काय शिकणार... गोष्टींचं पुस्तक घेतलं तर अभ्यासाला त्याचा काय उपयोग... प्राणी, पक्षी, गमतीजमती, विनोद, कविता यांची पुस्तकं म्हणजे नुसता वेळ घालवणं... शालेय पुस्तक म्हणजे खरं वाचन... अनेकदा अशी एक विभागणी पालकांच्या मनात असते. मुलासाठी पुस्तक विकत घेताना पालकांचा पहिला प्रश्न असतो, 'हे पुस्तक उपयोगाचं आहे ना?'

पण मुलासाठी पुस्तकाचा उपयोग नेहमी मोठ्यांच्या मोजपट्टीनंच ठरतो का?

एक पुस्तक की दहा गोष्टी?

साताठ वर्षांहून लहान मुलांसाठी पालक पुस्तकं निवडत असतील, तर हा अनुभव आणखी गमतीचा असतो. अशा मुलांसाठी आम्ही कमी मजकूर आणि अधिक चित्रं असलेली पुस्तकं दाखवतो. अनेकदा एका पुस्तकात एकच गोष्ट असते. अक्षरांची ओळख नुकतीच होत असलेल्या किंवा वाचन अजून सुरू न झालेल्या मुलांसाठी अशी पुस्तकं जास्त उपयुक्त असतात. पण काही पालक लगेच विचारतात, 'एकच गोष्ट आहे? मग पुस्तक लगेच संपणार!' त्यांना एका पुस्तकात दहा-पंधरा गोष्टी हव्या असतात. पुस्तक मोठं हवं, त्यात भरपूर मजकूर असायला हवा. मुलानं ते लगेच संपवता कामा नये.

पुस्तक किती दिवस पुरतं यापेक्षा ते मुलाच्या मनात किती दिवस पुरून उरतं, हे महत्त्वाचं नाही का? लहान मुलांसाठी असलेलं चित्रांचं पुस्तक बाहेरून पाहिलं, तर फार छोटं असतं; पण मुलासाठी ते छोटं असेलच असं नाही. चित्रात कोणता प्राणी आहे, तो कुठे उभा आहे, त्याच्या मागे काय आहे, त्याचा रंग कोणता आहे, तो काय करतोय, पुढे काय होईल, चित्रात आणखी काय काय आहे... पुस्तकातल्या प्रत्येक चित्राबाबत अशा अनेक गोष्टी मूल स्वतःच्या भाषेत सांगत असतं. मोठ्यांनी एकदा सांगितलेली गोष्ट चित्र पाहत मूल नंतर स्वतःच्या पद्धतीनं सांगू शकतं. अक्षरं अजून नीट वाचता येत नसली, तरी चित्र वाचता येतं. आणि वाचनाची सुरुवात अक्षरांपासूनच व्हायला हवी, असंही नाही.

गोष्ट समजण्यासाठी जगही माहीत असावं लागतं

लहान मुलांसाठी पुस्तक निवडताना आणखी एक गोष्ट लक्षात येते. आपण मुलांना गोष्ट वाचून दाखवतो खरी; पण त्या गोष्टीतलं जग मुलाला माहीत आहे का? गोष्टीत वाघ आहे. तो दिसतो कसा हे मुलाला चित्रातून समजू शकतं; पण वाघ म्हणजे काय, जंगल म्हणजे काय, जंगलात कोण कोण राहतं, वाघ कुठे राहतो, तो कसा चालतो, त्याचा आकार केवढा असतो, याचा प्रत्यक्ष अनुभव मुलाला नसला, तर गोष्टीतला वाघ आणि मुलाच्या अनुभवातला वाघ यांच्यामध्ये एक अंतर राहतं.

जंगल प्रत्यक्ष अनुभवलेलं असेल, तर पुस्तकात वाचत असलेली जंगलाची गोष्ट वेगळ्या प्रकारे उलगडते. शेत पाहिलेलं असेल, तर शेताची गोष्ट ऐकताना शब्दांना वेगळा अर्थ मिळतो. नदी पाहिलेली असेल, तर पुस्तकातली नदी मनात अधिक सहज उभी राहते.

म्हणूनच पुस्तकं देताना मुलांना त्याच्याबरोबर जगही द्यावं लागतं. जंगल, समाज, परिसर, जग यांचंही पुस्तकासारखं वाचन करायला हवं.

मुलांना बाहेर घेऊन जाणं, झाडं दाखवणं, बाजारात घेऊन जाणं, शेत पाहू देणं, बसनं प्रवास करताना बाहेरचं जग दाखवणं, घरातल्या वस्तूंबद्दल बोलणं, आजीआजोबांच्या गोष्टी ऐकायला मिळणं, मनात आलेले प्रश्न त्यांना विचारू देणं, या सगळ्याचा पुढे वाचनाशी संबंध जोडला जातो. मुलाच्या अनुभवविश्वात शब्दांसाठी जागा तयार झाली, की पुस्तकातले शब्द त्याच्याशी बोलायला लागतात. याचा अर्थ असा नाही, की मुलांना असा अनुभव मिळाल्याशिवाय पुस्तकंच वाचायला द्यायची नाहीत. उलट, पुस्तकं आणि अनुभव यांची एकमेकांना साथ मिळाली, तर वाचन अधिक समृद्ध होतं. सुरुवातीला अधिक चित्रं असलेली, मुलांच्या वयोगटाला साजेशी आणि त्यांच्या आसपासच्या अनुभवांशी जोडलेली पुस्तकं निवडता येतात.

जन्मल्यापासून स्पर्धा परीक्षा?

काही पालक मात्र याच्या अगदी उलट दिशेनं धावताना दिसतात. लहान बाळासाठी पुस्तक हवं म्हणताना काही जण लगेच विचारतात, 'सामान्य ज्ञानाची पुस्तकं आहेत का?' एक-दोन वर्षांच्या मुलांसाठी मुळाक्षरांची पुस्तकं शोधली जातात. मराठी-इंग्रजी अक्षरं, रंग, संख्या, प्राणी यांची माहिती देणारी पुस्तकं घेतली जातात. मुलाला अक्षरं ओळखता यायला हवीत, ह्यात चुकीचं काही नाही; पण बालपण हे काय अक्षरं, संख्या आणि सामान्य ज्ञानाचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची घाई करण्याचं वय आहे का? मुद्दा हा आहे, की आपण मुलाला पुस्तक देतोय, की अभ्यासाचं आणखी एक साधन देतोय?

मुलानं पुस्तक हातात घेतलं, ते उलटलं-पालटलं, त्यातली चित्रं पाहिली, प्रश्न विचारले, स्वतःच्या शब्दांत काहीतरी सांगितलं, त्यातल्या पात्रांशी स्वतःला जोडून घेतलं... हा सारा वाचन-प्रक्रियेचाच भाग आहे. पुस्तक किती पानांचं आहे यापेक्षा मुलानं त्यातून काय अनुभवलं, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.



मुलांसाठी पुस्तकं घेणारे पालक आणि पालकांसाठी पुस्तकं

पुस्तक-प्रदर्शनात आणखी एक गंमत दिसते.

काही पालक मुलांसाठी पुस्तकं घेण्यासाठी येतात. मुलांवर 'चांगले' संस्कार व्हावेत म्हणून धार्मिक पुस्तकं, बोधकथा,

चांगल्या सवयी सांगणारी पुस्तकं शोधतात. मुलाचा वयोगट काय आहे, त्याला ते पुस्तक समजेल का, त्याची आवड काय आहे, हे बहुतेक वेळा दुय्यम ठरतं. पालकांच्या मनात मुलाला काहीतरी चांगलं शिकवायचं असतं. हेतू चांगला असतो. पण मुलाला पुस्तकातून नेमकं काय मिळतंय, यापेक्षा आपण त्यातून मुलाला काय शिकवू इच्छितो, याला जास्त महत्त्व मिळतं.

मुलांसाठी पुस्तकं निवडताना आपण ज्या समजुती घेऊन येतो, त्या केवळ पुस्तकाच्या निवडीपुरत्या मर्यादित नसतात. त्या आपल्या पालकत्वाच्या कल्पनांशी जोडलेल्या असतात. म्हणूनच मुलांसाठी पुस्तकं निवडताना पालकांनी स्वतःसाठीही काही पुस्तकं निवडायला हवीत आणि स्वतःला काही प्रश्न विचारायला हवेत.

माझ्या मुलाला मी वाचताना पाहू इच्छितो, की माझ्या सांगण्याप्रमाणे वाचताना?

मुलानं पुस्तक स्वतः निवडावं असं मला वाटतं का?

मुलाला त्याच्या आवडीचं पुस्तक वाचू देण्याची माझी तयारी आहे का?

मुलानं पुस्तक पूर्ण केलंच पाहिजे, असा माझा आग्रह आहे का?

पुस्तक वाचल्यानंतर त्याला काय समजलं याची मी परीक्षा घेणार आहे का?

आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, मी स्वतः वाचतो का?

पालकत्वाचंही वाचन असतं

मुलासाठी पुस्तक घेण्यापूर्वी पालक म्हणून स्वतःसाठीही काही पुस्तकं वाचा असं आम्ही कधीकधी नव्या पालकांना सांगतो. यावर काही पालकांचं उत्तर मजेशीर असतं. 'आता आम्ही वाचून काय करायचं? आमचं सगळं झालं गेलं!' पण पालकत्वात आपलं 'सगळं' कधीच झालेलं नसतं. मुलाबरोबर पालकही पुन्हा शिकत असतो.

मुलं कशी शिकतात?

मुलं का रडतात?

का हट्ट करतात?

का खोटं बोलतात?

का एखाद्या गोष्टीला घाबरतात?

त्यांना किती स्वातंत्र्य द्यावं?

अभ्यासासाठी किती आग्रह करावा?

त्यांच्याकडून चूक झाल्यावर काय करावं?

परीक्षेचं महत्त्व किती असावं?

मुलांच्या खेळाला, प्रश्नांना आणि कंटाळ्यालाही जागा असावी का?

या प्रश्नांची उत्तरं आपल्याला आपल्या बालपणातून मिळतीलच असं नाही. मुलं बदलली आहेत. जग बदललेलं आहे. पालकत्वाच्या प्रश्नांकडे पाहण्याची आपली समजही बदलायला हवी. यासाठी मराठीत पालकांसाठी चांगलं वाचन-साहित्य उपलब्ध आहे. श्रुती पानसे यांची 'पहिली आठ वर्षं', 'मेंदूचा पासवर्ड', 'अशी का वागतात मुलं?', 'आई-बाबांची डायरी' यांसारखी पुस्तकं पालकत्वाकडे नव्यानं पाहायला मदत करतात. शोभा भागवत यांची 'सारं काही मुलांसाठी', 'झऱ्यातलं आकाश' ही पुस्तकंही मुलांना समजून घेण्याच्या दृष्टीनं महत्त्वाची वाटतात. फारूक काझी यांची 'शहाण्या बाबाची कहाणी' पालकत्वाकडे अनुभवाच्या नजरेतून पाहते. रेणू दांडेकरांचं लेखनही मुलांना समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरतं. निलेश निमकर आणि 'क्वेस्ट'च्या माध्यमातून संशोधनावर आधारित असलेलं पालक आणि बालशिक्षणाशी संबंधित साहित्य उपलब्ध झालेलं आहे. त्यांचा 'पहिली पायरी' हा पालकांसाठीचा अभ्यासक्रम आणि साहित्यही याच दिशेनं काम करतात.

ही नावं म्हणजे पालकांसाठी पुस्तकांची अंतिम यादी नाही. उलट, सुरुवातीला स्वतःसाठी पुस्तक शोधण्याची ही काही दारं आहेत. कारण मुलांच्या वाचनाची काळजी करणाऱ्या पालकांनी थोडं स्वतःचं वाचनही जपायला हवं.

मी स्वतः पालक झालो तेव्हा माझ्या मनात पालकत्वाविषयी काही ठाम समजुती होत्या. त्यातल्या काही समजुती ह्या चुकीच्या गृहीतकांवर आधारित होत्या, हे आज मागे वळून पाहताना मान्य करायला मला अजिबात संकोच वाटत नाही.

मुलांनी काय करावं, काय करू नये, किती वाचावं, किती अभ्यास करावा, शिस्त म्हणजे काय, 'चांगलं मूल' म्हणजे काय, याबद्दल आपल्याकडे तयार कल्पना असतात. तशा त्या माझ्याही होत्या. पण मुलांबद्दलची काही पुस्तकं वाचली, शिक्षणाकडे आणि बालकांच्या विकासाकडे पाहण्याच्या काही नव्या कल्पना समजल्या आणि पालकत्वाबद्दल माझ्या मनात असलेल्या अनेक संकल्पना बदलल्या. मुलाला बदलण्यापेक्षा आधी स्वतःला समजून घ्यावं लागतं, हे लक्षात आलं. कदाचित म्हणूनच आज पुस्तकांच्या दुकानात एखादा पालक मुलासाठी पुस्तक शोधत असतो, तेव्हा मला केवळ त्याला पुस्तक विकायचं नसतं.

पुस्तकांच्या दुकानात किंवा प्रदर्शनात कधीकधी एखादं मूल पुस्तक हातात घेऊन बराच वेळ उभं राहतं. कधी त्यातली चित्रं पाहतं, कधी पानं उलटतं, कधी पुस्तक परत ठेवतं. पुन्हा तेच पुस्तक उचलतं. मोठ्यांना कदाचित त्यात काही विशेष दिसत नाही; पण त्या मुलाला मात्र तिथे काहीतरी सापडलेलं असतं... कदाचित एखादं चित्र... एखादी गोष्ट... एखादा प्रश्न... किंवा फक्त पुस्तक हातात धरून पाहण्याचा आनंद...

मोठं होताना आपली पुस्तकांकडे पाहण्याची पद्धतही बदलते. पुस्तकात काय आहे, त्याचा उपयोग काय, मुलाला त्यातून काय शिकता येईल, ह्याकडे आपलं लक्ष जातं. मुलाला मात्र कधीकधी ते पुस्तक आवडतं. बस.

आणि पुस्तक निवडताना त्या आवडीसाठी आपण एवढीशी जागा ठेवली, तरी पुरेसं आहे. शेवटी पुस्तक मुलाच्या हातात जातं. पुढची गोष्ट तोच ठरवतो...



बसवंत विठाबाई बाबाराव

baswantv@gmail.com

गेली पंधरा वर्षे शाळेमधील पर्यावरण शिक्षण विषयात कार्यरत. पुण्यातील वनराई संस्थेच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमाचे कार्यक्रम समन्वयक.